**सोलापूर महानगरपालिका**

दि. १६ ऑक्टोबर २०१६

**प्रेस नोट**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाअंतर्गत सोलापूर शहर पाणीपुरवठा योजनेचा ई-भूमीपूजन शुभारंभ मा. मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी आज सायं. ६.०० वा मुंबई येथून वर्षा निवासस्थानावरुन केला.

या शुभारंभप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील व्हीडीओ कॉन्फरंन्सींग प्रसंगी मा. पालकमंत्री ना. श्री. विजयकुमार देशमुख, मा. महापौर प्रा.सुशीला आबुटे, मा.उपमहापौर श्री. प्रवीण डोंगरे, मा.स्थायी समिती सभापती, श्री. रियाज हुंडेकरी, विरोधी पक्षनेते, श्री. नरेंद्र काळे, मनपा आयुक्त श्री वि.ना.काळम तसेच अन्य पदाधिकारी, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाचे अधिक्षक अभियंता श्री. गरांडे, प्रकल्प कंत्राटदार हेही याप्रसंगी उपस्थित होते.

मा.पालकमंत्री महोदयांनी मा. मुख्यमंत्री यांना या शुभारंभानंतर शहराच्यावतीने ही योजना शहरासाठी दिल्याबददल आभार मानले. तसेच, या योजनेच्या अंमलबजावणीमुळे होणा-या बाबींवर चर्चा करुन त्याचा कसा फायदा शहरास होणार आहे, याबाबत मुख्यमंत्री महोदय यांना विषद केले.

या योजनेअंतर्गत एकुण मंजूर किंमत र.रु. ७१.५२ कोटी असून पहिल्या टप्प्यात एकुण र.रु. ४२.६४ कोटीचे एकुण प्रमुख १५ कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने कोंडी ते बाळेपर्यंत ५.५ कि.मी. लांबीची बीडब्ल्युएससी पाईपलाईन करणे, सोरेगाव, पाकणी, भवानीपेठ जलशुध्दीकरणाची दुरस्ती, शहरात पाच नवीन उंचावरील पाण्याच्या टाक्या बांधणे, एनटीपीसी लाईन सोरेगाव, पाकणी येथे जोड घेवून ती पाईपलाईन जलशुध्दीकरण जोडणे, उजनी ते पाकणी पाईपलाईन दुरुस्ती करणे, जलपूर्नःभरण करणे, शहरातील पाण्याच्या टाक्यांना वॉटर मीटर बसविणे इ. काम समाविष्ट आहेत.

तसेच, दुस-या टप्प्यात पंपीग मशीनरी बसविणे, पाकणी येथे सोलर प्रकल्प २.५ मेगा वॅट कार्यान्वीत करणे याचा समावेश आहे. सदरील पहिल्या टप्प्यातील कामे यासाठी दोन वर्षाचा कालावधी निर्धारित केलेला असूनही, ही कामे एक ते सव्वा वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यामुळे शहरवासीयांचा पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात निश्चित सुटण्यास मदत होणार आहे.

प्रति,
मा.संपादक,
दैनिक

उक्त प्रेसनोट कृपया आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दीस दयावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी,**
**सोलापूर महानगरपालिका.**